पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - ३
सभावृत्तांत

दिनांक - ०१/०६/२०१६ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.०१/०६/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे – सभापती**
२. मा.आल्हाट मंदा उत्तम
३. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४. मा.सुपे आशा रविंद्र
५. मा.सौ.सुरेखा शंकर गव्हाणे
६. मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
७. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
८. मा.रसाळ विजय सुदाम - स्विकृत सदस्य
९. मा.सोमवंशी प्रकाश बबनराव - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.चंद्रकांत इंदलकर- क्षेत्रीय अधिकारी, मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी,मा.जीवन गायकवाड, कार्य अभियंता (स्थापत्य), मा.थोरात– कार्य अभियंता, (विद्युत)), मा.प्रविण घोडे – कार्यकारी अभियंता (विद्युत) मा.श्री.कोंडे के.बी. उपअभियंता, (पाणीपुरवठा), मा.संजय घुबे - उप अभियंता, मा.व्ही.सी.काळे उप अभियंता, (स्थापत्य), मा.लांडे बी.पी –उपअभियंता (विद्युत) मा.मनोज सेठीया – उपअभियंता (जनि) मा.अर्चना अत्तरदे क.अभियंता, मा. श्री. इप्पकायल एस. एच. लेखाधिकारी, मा.पी.आर.तावरे – मुख्य आरोग्य निरीक्षक, मा.एस.व्ही.बगाडे (सहा.उद्यान अधिक्षक) मा.शिराळ एस.डब्ल्यू – मुख्याध्यापक, -----

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे. ------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**------**

**विषय क्रमांक १.** ठेकेदार पध्दतीने नाले व गटर साफ करणे या लेखाशिर्षातून ठेकेदार पध्दतीने हायसिंथ निर्मुलन करणे या लेखा शिर्षावर तरतूद वर्ग करणेबाबत. आरोग्य विभागाकडील पत्र क्र. इक्षेका/आ/२/कावि /५०६/ २०१६, दिनांक १/६/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक २.** प्रभाग क्र. ३६ लांडेवाडी मधील नाल्याच्या कडेने असणारे डी.पी.रस्ते विकसीत करणेबाबत. मा.विश्वनाथ विठोबा लांडे, नगरसेवक यांचे दिनांक १/६/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक ३.** प्रभाग क्र. ३६ लांडेवाडी नाले साफसफाईबाबत. मा.विश्वनाथ विठोबा लांडे, नगरसेवक यांचे दिनांक १/६/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक ४.** सार्वजनिक संडास ब्लॉक नुतनीकरण करणेबाबत. मा.सुरेखाताई शंकर गव्हाणे नगरसेविका यांचे १/६/२०१६ चे पत्र.

अ) दिनांक ४/५/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ०२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक- ६ विषय क्रमांक- १

दिनांक- १/६/२०१६

सूचक- मा.सुरेखा शं.गव्हाणे अनुमोदक- मा.आशा सुपे

संदर्भ – ठेकेदार पध्दतीने नाले व गटर साफ करणे या लेखाशिर्षातून ठेकेदार पध्दतीने हायसिंथ निर्मुलन करणे या लेखा शिर्षावर तरतूद वर्ग करणेबाबत. आरोग्य विभागाकडील पत्र क्र. इक्षेका/आ/२/कावि /५०६/१६, दिनांक १/६/१६ चे पत्र.

इ क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विभागामध्ये सन २०१६- २०१७ चे अंदाज पत्रकीय तरतूद मध्ये आरोग्य विभागातील “ठेकेदार पध्दतीने नाले व गटर साफ करणे” या लेखाशीर्षावर तरतूद र.रु.२३,००,०००/- करणेत आलेली आहे. नाले सफाईची र.रु. १२,२३,५५७/- ची निविदा काढण्यात आली. या लेखाशिर्षावर र.रु.१०,७६,४४३/- शिल्लक आहे. तसेच स्ट्रॉर्म वॉटर पावसाळी गटर्स साफसफाई करणे हे लेखाशिर्षावर इ क्षेत्रीय आरोग्य विभागाकडे तरतूद करण्यात आली नाही. त्यामुळे स्ट्रॉर्म वॉटर पावसाळी गटर्स साफसफाई करणे याची र.रु.३,०१,८०६/- इतक्या निविदा काढणेत आली आहे. या दोन्हीची एकूण र.रु.१५,२५,३६३/- वजा जाता र.रु. ७,७४,६३७/- इतकी रक्कम शिल्लक राहते.

“ठेकेदार पध्दतीने हायसिंथ निर्मुलन करणे” या लेखाशिर्षावर आज दि.३१/५/२०१६ रोजी र.रु.१०,०००/- इतकी तरतूद शिल्लक आहे. तसेच आर्थिक वर्ष सन २०१५-१६ मधील मे. दत्तकृपा स्वयंरोजगार संस्था यांचे इंद्रायणी नदीपात्रातील जलपर्णी/हायसिंथ काढणे कामाचे उर्वरीत बील र.रु.३९३४८/- त्या आर्थिक वर्षात तरतूद शिल्लक नसल्यामुळे सदरचे बील चालू आर्थिक वर्षात अदा करणे आवश्यक आहे. त्यामुळे ठेकेदार पध्दतीने नाले व गटर साफ करणे या लेखा शिर्षावरुन सदरची रक्कम वर्ग करता येणे शक्य आहे. तरी ठेकेदार पध्दतीने नाले व गटर साफ करणे या लेखा शिर्षामधून ठेकेदार पध्दतीने हायसिंथ निर्मूलन करणे या लेखा शिर्षावर र.रु. ३५,०००/- इतकी रक्कम वर्ग करता येणे शक्य आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षात वर्ग करावयाच्या रकमा नियमानुसार वर्ग करता येत असल्याने सदरचा विषय मा.प्रभाग समिती पुढे ऐनवेळचा विषय निर्णयार्थ ठेवणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता सदरची पुढील कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक- ७

विषय क्रमांक- २

दिनांक- १/६/२०१६

सूचक- मा.विश्वनाथ विठोबा लांडे अनुमोदक- मा. डॉ.श्रध्दा लांडे

संदर्भ – मा. मा.विश्वनाथ विठोबा लांडे यांचे दिनांक ०१/०६/२०१६ चे पत्र.

लांडेवाडी प्रभाग क्र. ३६ मधील भगतवस्ती, गुळवेवस्ती परिसरातील नाल्याच्या बाजूने असणारे डी.पी.रस्त्यांची अवस्था खूपच खराब आहे तेंव्हा सदरचे डी.पी.रस्ते तातडीने विकसीत करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक- ८ विषय क्रमांक- ३

दिनांक- १/६/२०१६

सूचक- मा.विश्वनाथ विठोबा लांडे अनुमोदक- मा. डॉ.श्रध्दा लांडे

संदर्भ – मा. मा.विश्वनाथ विठोबा लांडे यांचे दिनांक ०१/०६/२०१६ चे पत्र.

लांडेवाडी प्रभाग क्र.३६ मधील भगतवस्ती, गुळवेवस्ती, शांतीनगर व लांडेवाडी परिसरातील सर्व नाल्यांची साफसफाई झाली नसल्याने पावसाळयापुर्वी सर्व नाल्यांची साफसफाई करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक- ९ विषय क्रमांक- ४

दिनांक- १/६/२०१६

सूचक- मा.सुरेखा गव्हाणे अनुमोदक- मा.आशा सुपे

संदर्भ – मा.सुरेखा शंकर गव्हाणे यांचे दिनांक ०१/०६/२०१६ चे पत्र.

वॉर्ड क्र. ३४ मधील अग्निशमन समोरील गव्हाणेवस्ती येथील सार्वजनिक संडास ब्लॉक असून त्याची दुरावस्था झालेली आहे. सदर संडास ब्लॉक पाडून त्या ठिकाणी नवीन संडास ब्लॉक तयार करावेत जेणेकरुन नागरीकांची सोय होईल तसेच भोपते वस्ती, पुणे नाशिक रोड येथील सार्वजनिक संडास ब्लॉक दुरुस्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

सही/-
डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे
सभापती
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/४/४०७/२०१६
दिनांक- १०/०६/२०१६

सही / -
प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय,
भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**दि.१/६/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.नाना लोंढे –** प्रत्येक वॉर्डमध्ये सर्व विभागातील अधिका-यांनी Visit दिली पाहिजे. प्रत्येक वेळेस एका वॉर्डमध्ये भेट देणे गरजेचे आहे. वॉर्डमध्ये फिरल्या नंतरच अधिका-यांना कुठे काय चालले आहे हे लक्षात येईल. याबाबतचा आदेश स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, जल:नि सारण, आरोग्य व अतिक्रमण विभागातील सर्व अधिका-यांना देण्यात यावा. आदेश प्राप्त झाल्यानंतर सर्व अधिका-यांनी प्रत्येक वॉर्डमध्ये आले पाहिजे.

**मा.डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे (सभापती) –** पालखीचे काय नियोजन केले आहे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – पालखीचे सर्व नियोजन मुख्य कार्यालयातील (जनता संपर्क विभागाकडून) केले जाते.

**मा.डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे (सभापती) –** इ प्रभागाकडून काही कामे करायची असेल तर ती करण्यात यावी.

**मा.जीवन गायकवाड (कार्य.अभियंता स्थापत्य)** – रस्त्याचे डांबरीकरणाचे काम केले जाईल. पालखीचे वेळी लागणा-या स्टेजचे काम दोन तीन दिवस अगोदर करण्यात येते.

**मा.सुरेखा गव्हाणे** – माझे वॉर्डमधील चेंबर्सला झाकण नाही. सर्व चेंबर्सची झाकणे तुटलेली आहेत. पावसाळा सुरु होण्याअगोदर सर्व चेंबर्सची झाकणे बसविण्यात यावी.

**मा.नाना लोंढे –** सगळीकडील चेंबर्सची झाकणे तुटलेली आहेत. झाकणे बसविण्यात यावी. स्ट्रॉम वॉटरचे काय झाले आहे.

**मा.प्रभाकर तावरे** – दुरुस्तीचे काम आपल्याकडे नाही. साफसफाईचे काम आपलेकडे आहे. नाले साफ सफाईचे काम चालू केले आहे.

**मा.मंदा आल्हाट** – मोशी येथील देहू फाटा रस्त्यावरील पाण्याचे काय झाले?

**मा.अंकुश कोंडे - (उपअभियंता पाणीपुरवठा) –** मोशी येथील देहू फाटा रस्त्यावरील पाणीपुरवठा व्यवस्थित करण्यात येईल.

**मा.आशा सुपे –** बी.व्ही.जी.कडून ममता स्वीट चौकामध्ये खोदले आहे. त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होतो. तरी ज्या ठिकाणी खोदलेले आहे त्या ठिकाणी डांबरीकरण करण्यात यावे.

**मा.जीवन गायकवाड (कार्य.अभियंता स्थापत्य) –** डांबरीकरणाचे काम करुन देण्यात येईल.

**मा.मंदा आल्हाट** - आमचे वॉर्डमध्ये धुराची गाडी येत नाही. प्रत्येक ठिकाणी धुराची गाडी फिरायला पाहिजे. औषध फवारणी कुठे केली ते दाखविले पाहिजे. पावसाळयाच्या आत त्यांची नोंद घेतली पाहिजे. धुराची गाडी व औषध फवारणी पावसाळा सुरु होण्यापुर्वी आली पाहिजे.

**मा.नाना लोंढे** – सगळया विभागातील सर्व अधिकारी वॉर्डमध्ये फिरले पाहिजे. याबाबतचे नियोजन करण्यात यावे.

**मा.प्रभाकर तावरे (मुख्य आरोग्य निरीक्षक)** - आरोग्य विभागाचे अधिकारी/कर्मचारी सर्व वॉर्डमधील पाहणी करुन त्याप्रमाणे कामकाज करीत असतात.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.